# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 06/03/2021 (शनिवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 01 कि. मी अंतरावर पाटबंधरे उपविभागचे कार्यालय धवड लेआउट काटोल येथे फिर्यादी नामे– विलास कृष्णराव ढोले, वय 29 वर्ष, रा कांरजा हे कनिष्ठ लिपीक म्हणून धवड लेआउट काटोल येथे नौकरी करतात. दिनांक 04/03/2021 चे 09.45 वा. ते दिनांक 05/03/2021 चे 09.30 वा. दरम्यान फिर्यादी हे ऑफीसला लॉक लावून चालक राहूल देवरावजी डहाट सहीत घरी गेले. दि 05/03/21 रोजी चालक राहूल देवरावजी डहाट यांनी ऑफीसचा दरवाजा उघडले ऑफीस आतमध्ये जावून पाहणी केली असता एक प्रिन्टिर मशिन कॅनन कि 20,000 रू व ऑटो लेवल मशीन कि 15,000 रू चा माल दिसला नाही तर राहूल यांनी मला फोनव्दारे काळविले ऑफीस ला जावून पाहणी केली असता ऑफीस च्या मागच्या दरवाज्यावरची एक पाटी काढून आत प्रवेश करून 1 प्रिन्टिर मशिन कॅनन कि 20,000 रू व ऑटो लेवल मशीन कि 15,000 रू असा एकूण 35,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार आरूण भेंडे 9923193642 हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर पटगोवारी येथे दिनांक 01/10/2018 चे 00.01 वा. ते 01/07/2019 चे 17.00 वा. पर्यंत आरोपी क्र. 1) बदुदोजा तस्लीमउद्दीन खान वय 33 वर्ष व 2) श्रीमती हुमा बद्रुदोजा खान वय 29 वर्ष दोन्ही रा. प्लॉट क्र. 17 आदर्श नगर, दिघोरी उमरेड रोड नागपुर यांनी संगणमत करून फिर्यादी नामे– श्रीमती लीलाबाई केशवराव कामडे, वय 58 वर्ष, रा. लालगंज बस्तरवारी गोडपुरा प्लॉट नं 388 नागपुर यांना म्हटले की, " तुमच्या शेतात मोबाईल टॉवर लावुन देतो व त्याचा मासीक किराया 40,000/–रु. मिळुन देतो त्याकरीता टॉवरच्या किरायाचा कराराचा करावा लागेल असे म्हणुन फिर्यादी व फिर्यादीच्या बहिनीकडुन खोटा विक्रीपत्राचा करारनामा तयार करून मौजा पटगोवार येथील शेत जमीन लबाडीने आरोपी क्र 2) हुमा बद्रुदोजा खान वय 29 वर्ष रा. आदश नगर दिघोरी उमरेड रोड नागपुर हिचे नावावर करून घेउन फिर्यादी व फिर्यादीची बहिन नामे कलाबाई सुधाकर केळेकर रा. कन्हान यांची फसवणुक केली. अशा फिर्यादीच्या तक्रारीवरून मा. प्रथम वर्ग न्यायालय रामटेक यांच्या आदेशान्वये फौजदारी प्रक्रीया संहिता कलम 156(3)अन्वये सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 420, 468, 471, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि बोरकर सा. 9552535825 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत एनएच 7 रोडचे पलीकडे रोडवर बोरी येथे दिनांक 05/03/2021 चे 11:00 वा. दरम्यान कोमल देविराम वानखेडे (मृतक)वय 45 वर्ष रा. सातगाव हे पायदळ कामावर जात असता अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पायदळ चालनारे कोमल वानखेडे यांना धडक दिल्याने त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रूकसाना अकबर खान, वय 45 वर्ष, रा. खदान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि सुरजुसे 7666640218 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर